# राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे यांचे समोरील माहिती अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १८ अन्वये प्राप्त तक्रार.

क्र. रामाआ-तक्रार केस १५१/२०१७/सांगली
राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे,
नवीन प्रशासकीय इमारत,
विधान भवना समोर, पुणे - १

श्री. संभाजीराव दिनकरराव सावंत — तक्रारदार

विरुध्द

जन माहिती अधिकारी तथा निरीक्षक,
सांगली जिल्हा माथाडी आणि असंरक्षित कामगार मंडळ, — उत्तरवादी
सांगली

प्रथम अपिलीय अधिकारी तथा सचिव,
सांगली जिल्हा माथाडी आणि असंरक्षित कामगार मंडळ,
सांगली

## सुनावणी दिनांक: १६/०९/२०२१

तक्रारदार यांनी दि.१५/११/२०१७ रोजी राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ पुणे यांचेकडे तक्रार अर्ज दाखल केला होता.

प्रस्तुत तक्रार अर्जाच्या अनुषंगाने आयोगाने सर्व संबंधितांना Email/Whats Appद्वारे सुनावणीचे सूचना पत्र पाठवून संबंधितांनी Google Meet या व्हिडीओ कॉन्फरन्स माध्यमाद्वारे सुनावणीस उपस्थित रहावे, असे कळविले.

त्यानुसार सुनावणीस तक्रारदार व विद्यमान जन माहिती अधिकारी व्हिडीओ कॉन्फरन्सद्वारे हजर आहेत. विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित होते.

सुनावणीचे वेळी तक्रारदार यांनी असे कथन केले की, “माझा तक्रार अर्ज दि.१५/११/२०१७

रोजीचा असून त्यामध्ये लेखी निवेदन पाहून निर्णय द्यावा अशी मागणी केलेली आहे."

अर्जदाराने त्यांच्या तक्रार अर्जात एकूण तीन तक्रार नमूद करुन कारवाई करण्याची अपेक्षा व्यक्त केलेली आहे.

सदर प्रकरणी आज रोजी झालेल्या सुनावणी दरम्यान आयोगासमक्ष उपलब्ध असलेले कागदोपत्री पुरावे व युक्तिवादावरून असे दिसून येते की, मा.मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने रिट पिटीशन क्र.५१३२/२००८ नगर युवक शिक्षण संस्था व यशवंतराव चव्हाण अभियांत्रिकी महाविद्यालय, वानाडोंगरी, नागपूर विरुध्द राज्य माहिती आयोग, नागपूर खंडपीठ या प्रकरणी दि.२०/०८/२००९ रोजी खाजगी संस्थेची विनाअनुदानित शाळा व महाविद्यालये माहितीचा अधिकार अधिनियमातील कलम २ (ज) प्रमाणे " **सार्वजनिक प्राधिकरणाच्या**" च्या व्याख्येमध्ये समाविष्ट होऊ शकत नाहीत असा निर्णय दिलेला आहे. " There is absolutely no material on record that both the Petitioners have been substantially financed by the appropriate government either directly or indirectly. On the contrary, the entire infrastructure and the salary of the staff etc., is substantially financed by Petitioner No.१ itself. This term "substantially financed has been repeatedly used by the Parliament with a view to exclude such institutions which are financed directly or indirectly with a small or a little contribution of funds by the appropriate government. The Parliament has deliberately used the word "substantially" and this court finds that there is wisdom in doing so." तसेच मा.पंजाब व हरयाना उच्च न्यायालयाने रिट पिटीशन क्र.१३६७६/२०१० प्रकरणी सुध्दा हाच निर्णय दिलेला आहे. "From the above, it thus follows that the case of Ravneet Kaur (Supra) or the case of D.A.V.College Trust and Management Society (supra) would not be good precedent to direct respondent no.२ to supply the information in so much as the said respondent might be imparting education and performing public functions, however, is not receiving substantial grant-in-aid." यावरुन हे स्पष्ट होते की भरीव स्वरुपाचे अर्थसहाय्य न मिळणा-या (विनाअनुदानित) संस्थांना माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू होत नाही.

प्रस्तुत प्रकरणात, सांगली जिल्हा माथाडी आणि असंरक्षित कामगार मंडळ,सांगली यांना शासनाचे कोणतेही अनुदान मिळत नसल्याने, सदर संस्था सार्वजनिक प्राधिकरण या संज्ञेत येत नसल्याने त्यांना माहितीचा अधिकार अधिनियम-२००५ च्या तरतूदी लागू होत नाहीत. तसेच सदर संस्थेच्या संदर्भात आयोगाने यापूर्वी द्वितीय अपिल क्र.४५९४/२०१७/सांगली या प्रकरणात सदर संस्थेला माहितीचा अधिकार कायदा लागू होत नसल्याने प्रस्तूत अपिल निकाली काढलेले आहे.

अर्जदाराने त्यांचे तक्रार अर्जात कारवाई करण्याची अपेक्षा व्यक्त केलेली आहे. माहिती अधिकारात ही बाब अभिप्रेत नाही.

उपरोक्त पार्श्वभूमिवर आयोग खालील प्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश.**

प्रस्तुतचा तक्रार अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग महाराष्ट्र सत्यमेव जयते पुणे खंडपीठ

(दिलीप ल. धारूरकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ, पुणे

जावक क्र. 654/2022/सांगली दिनांक - 3/5/22

LSG-2020